ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ३९ वे दिनांक : ३१/०१/२०२६ वार : शनिवार

## जुळून आल्यास उद्याच शपथविधी - छगन भुजबळ



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची उद्या बैठक होईल. त्यात विधिमंडळ पक्षनेतेपदाची आणि उपमुख्यमंत्रीपदाच्या नावाची निवड केली जाईल, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी दिली. छगन भुजबळ, सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, धनंजय मुंडे या नेत्यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. तसेच अजित पवारांची खाती आणि इतर मुद्यांवर चर्चा झाली.

छगन भुजबळ माध्यमांशी बोलताना म्हणाले की, उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाची चर्चा होत आहे. त्यांना उपमुख्यमंत्री करावे, अशी मागणी होत आहे. उद्या आमदाराची बैठक बोलावली आहे. सारे जुळून आल्यास, तर उद्याच शपथविधी होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली असतानाच उपमुख्यमंत्री पदावरून चर्चा सुरू झाली आहे. अनेकांचे म्हणणे आहे की सुनेत्रा पवार यांची निवड अजित पवारांच्या पदावर करण्यात यावी. त्यानुसार राजकीय वर्तुळात हालचाली देखील सुरू असल्याचे दिसून येत आहे. मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर तटकरे यांनीही पत्रकारांशी संवाद साधला असून, उपमुख्यमंत्री पदाबाबत धार्मिक विधी झाल्यानंतर निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

सुनील तटकरे म्हणाले, दादांच्या अकाली जाण्याच्या धक्क्यातून आम्ही कोणीही सावरलो नाहीये. आम्हाला अजूनही असे वाटते की दादा आमच्यातच आहेत. या शोकमग्न अवस्थेतच आम्ही आहोत. आज अजितदादांच्या अनुपस्थितीत कार्यालयात येणे हे माझ्यासाठी क्लेशकारक आहे. या कार्यालयात त्यांनी पक्षाचे संघटन उभे केले, इथे त्यांच्यासमोर नतमस्तक व्हावे यासाठी मी कार्यालयात आलो. याच भावनेने मी आलो होतो.

पुढे बोलताना सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यासंदर्भात बोलताना म्हणाले, आज मी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली हे खरे आहे. सुनेत्रा वहिनी आणि कुटुंब धार्मिक विधीमध्ये आहेत. धार्मिक विधी झाल्यानंतर आम्ही सर्व चर्चा करणार आहोत. आणि त्यानंतर आम्ही ठरवू. जे काही जनतेच्या मनात आहे, कार्यकर्त्यांच्या मनात आहे त्यानुसार निर्णय घेऊ. आज आपण पाहत आहोत की संपूर्ण राज्य शोकात आहे. दादांचे सर्व पैलू संबंध महाराष्ट्राने अनुभवले आहेत. त्यातच आम्ही आहोत, असे तटकरे यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात छगन भुजबळ यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, अजित पवार गेले आणि ज्या पद्धतीने गेले आहेत, त्यामुळे झोप उडाल्यासारखी झाली आहे. पण आता असे आहे की शेवटी 'शो मस्ट गो ऑन' असे म्हणतात, त्यामुळे कोणावर तरी जबाबदारी देऊन हे चालवले पाहिजे, पक्ष असेल सरकार असेल. उद्या मला असे वाटते की जे विधानमंडळातले जे नेते आहेत आमचे, त्यांची बैठक बोलावली आहे. त्यात पक्षाचे प्रमुख पद जे अजितदादांकडे होते, ते देण्याच्या संदर्भात निर्णय होईल.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, लोकांची जी मागणी आहे ती रास्त आहे. सुनेत्रा ताईंकडे पक्ष प्रमुख पद देण्यात यावे. अनेक लोकांची अशी मागणी आहे आणि त्यात काही चूक आहे, असे मला वाटत नाही. पण शेवटी याबाबत जो काही निर्णय होणार आहे तो सीएलपीमध्ये होईल. भुजबळ यांना दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चेविषयी विचारले असता, त्यांनी याबाबत मला फारसे काही माहित नसल्याचे स्पष्ट केले आहे.

छगन भुजबळ म्हणाले, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार की नाही याबाबत मला फारसे माहित नाही. पण आता सध्या ही राष्ट्रवादी जी आहे अजित पवारांची, यात जे काही कामे आहेत, त्याकडे आपण लक्ष देत आहोत. उपमुख्यमंत्री पद रिकामे आहे, ते पद सुनेत्रा ताईंच्या माध्यमातून कसे भरता येईल त्यावर आमचे जास्त लक्ष आहे. बाकीचे पुढे बघता येईल. लोक जसे ठरवतील त्यानुसार निर्णय घेता येईल. उद्याच्या बैठकीत सगळ्यांचे एकमत झाले तर, उद्याच्या उद्या शपथविधी होऊ शकतो, असे सूचक विधान भुजबळ यांनी केले आहे.

## महात्मा गांधींच्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यात सर्वधर्म प्रार्थना



**पुणे :** महात्मा गांधींच्या पुण्यतिथीनिमित्त पुणे येथील गांधी भवन, कोथरूड येथे शुक्रवारी सर्वधर्म प्रार्थना आणि भजन आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत आणि माजी आमदार उल्हास पवार यांनी गांधी विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, गांधी विचार कधीही संपणार नाहीत आणि त्यांना जगभरात मान्यता व सन्मान आहे.

कार्यक्रमात 'मानवतेसाठी लढणारा महात्मा' या अॅड. शंकर निकम लिखित पुस्तकाचे प्रकाशन शीलाताई बाबा आढाव यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी उल्हास पवार यांच्यासह डॉ. चैत्रा रेडकर, लक्ष्मिकांत देशमुख आणि अन्वर राजन व्यासपीठावर उपस्थित होते. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीने या कार्यक्रमाचे संयोजन केले.

उल्हास पवार यांनी आपले अनुभव कथन करताना सांगितले की, लंडन आणि वॉशिंग्टन येथे गांधीजींच्या जीवनावर आधारित चित्रपटांचे सर्व शो हाऊसफुल्ल होते. तेथे तीन पिढ्या एकत्र बसून चित्रपट पाहत होत्या. परदेशी नागरिक गांधीजींच्या देशातून आलेला म्हणून त्यांच्याशी संवाद साधत होते. हे गांधी विचारांच्या जागतिक प्रभावाचे द्योतक आहे.

पवार पुढे म्हणाले की, गांधीजींच्या हत्येचे सहा वेळा प्रयत्न झाले आणि त्यांचे विचार संपवण्याचे अनेकदा प्रयत्न झाले व आजही होत आहेत. गांधीजींची हत्या झाली असली तरी त्यांचे विचार आजही लोकांच्या मनात, विचारात आणि आचरणात जिवंत आहेत. त्यांच्यावर असंख्य पुस्तके लिहिली गेली आहेत. अॅड. शंकर निकम यांनी गांधी विचारांचा अतिशय बारकाईने मागोवा घेतला असून, त्यांचे वाचन व चिंतन सर्व वयोगटातील लोकांनी करावे असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. चैत्रा रेडकर यांनी गांधीजींच्या जात निर्मूलनाविषयीच्या कार्यावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या की, गांधीजींनी जात नको, पण ज्या व्यवसायामुळे जात नावास आली, तो व्यवसाय आणि ते कलाकौशल्य टिकवले पाहिजे अशी भूमिका घेतली होती. तेल घाणा कसा चालवायचा याचे ज्ञान तेली समाजातील व्यक्तींना आहे, त्याचा उपयोग राष्ट्रनिर्मितीसाठी आणि देशाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी होऊ शकतो.

त्यांनी स्पष्ट केले की, तेली समाजाला वर्षानुवर्षे जातीवरून हिणवले गेले, त्यामुळे तरुण पिढी आता इतर व्यवसाय आणि नोकरीकडे वळत आहे. अशा स्थितीत जात नको, पण व्यवसाय टिकवा असे गांधीजींचे मत होते. समाजात द्वेष पसरवण्यासाठी समाजमाध्यमातून गांधीजींविषयी जो अपप्रचार केला जातो, त्याला अभ्यासपूर्ण लेख आणि अनुभवाद्वारे नेस्तनाबूत करण्याची गरज आहे.

## राज-उद्धव ठाकरेंबद्दल अपशब्द; सोशल मीडियावरील पोस्टमुळे नालासोपाऱ्यात तरुणाची धिंड



**मुंबई :** सोशल मीडियावर राजकीय नेत्यांबद्दल आक्षेपार्ह आणि अपमानास्पद भाषा वापरणे एका तरुणाला चांगलेच महागात पडल्याची खळबळजनक घटना नालासोपारा परिसरात समोर आली आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्याबद्दल एकेरी उल्लेख करत अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन अपशब्द वापरून पोस्ट करणाऱ्या तरुणाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी चोप दिला. या घटनेत संबंधित तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली असून, त्याची अर्धनग्न अवस्थेत परिसरात धिंड काढण्यात आल्याचे पाहायला मिळाले. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, त्यामुळे राजकीय वर्तुळात आणि नागरिकांमध्येही चर्चेला उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सूरज महेंद्र शिर्के असे या तरुणाचे नाव असून, तो गेल्या काही दिवसांपासून फेसबुक आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सातत्याने राजकीय नेत्यांविरोधात आक्षेपार्ह पोस्ट करत होता. विशेषतः मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्याबद्दल त्याने अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीका केली होती. या पोस्टमधून त्याने एकाच नेत्याला मान्य असल्याचे सांगत इतर नेत्यांवर चोर असल्याचे आरोप केले होते. या पोस्टमुळे मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली होती.

या तरुणाच्या पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसरल्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये असंतोष वाढत गेला. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्याबद्दल वापरलेली भाषा अत्यंत अश्लील आणि अपमानास्पद असल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला. काही पोस्टमध्ये राज ठाकरे यांच्या भूमिकांवर टीका करताना अपमानजनक शब्द वापरण्यात आले होते, तर उद्धव ठाकरे यांच्याबद्दलही अत्यंत अवमानकारक उल्लेख करण्यात आला होता. या प्रकारामुळे ठाकरे कुटुंबीयांचे समर्थक एकत्र आले आणि या तरुणावर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली.

दरम्यान, मनसेचे उपविभाग अध्यक्ष किरण नकाशे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना संबंधित तरुण नालासोपारा परिसरात लपून बसल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच मनसे आणि शिवसेनेच्या काही कार्यकर्त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी धाव घेतली. कार्यकर्त्यांनी तरुणाला पकडून त्याचा चोप दिला. इतक्यावरच न थांबता, त्याला अर्धनग्न करून रस्त्यावरून सुमारे दीड किलोमीटरपर्यंत फिरवण्यात आले. या घटनेदरम्यान काही नागरिकांनी मोबाईलवर व्हिडिओ शूट केला, जो नंतर सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला.

या प्रकारामुळे नालासोपारा परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. रस्त्यावर घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. काही ठिकाणी गर्दी जमली होती, तर काही नागरिकांनी या प्रकारावर नाराजी व्यक्त केली. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमुळे या घटनेची चर्चा राज्यभर पसरली आहे. अनेकांनी या प्रकाराला कायद्याच्या चौकटीबाहेरील कारवाई असल्याचे म्हटले, तर काहींनी सोशल मीडियावरील मर्यादा ओलांडणाऱ्या पोस्टविरोधात संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३१ जानेवारी २०२६


## कोकणचा राजा

पौष्टिक सात्विक
नारळाचे फळ
मिळते बळ
आजाऱ्यांना

देवाच्या मंदिरी
नारळ फोडूया
हात जोडूया
भक्तीभावाने

नितळ मधूर पाणी
नारळाच्या पोटी
खण-नारळाची ओटी
शुभ कार्यात

मानवास लाभले
अनमोल धन
मानू सदा ऋण
निसर्गाचे

कोकणचा राजा
त्याला खूप मान
कलशात स्थान
देवापुढे




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९९०६


# डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात वा. ल. कुलकर्णी व्याख्यानमाला संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने प्राप्त अनुदानांतर्गत “वा.ल. कुलकर्णी व्याख्यानमाला” उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या व्याख्यानमालेस उद्घाटक व प्रमुख वक्ते म्हणून मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष मा. श्री. कौतिकराव ठाले-पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई होत्या.यावेळी व्यासपीठावर मराठी विभाग प्रमुख डॉ. मीनाक्षी देव-निमकर, डॉ. प्रेमला मुखेडकर, प्रा. माधुरी भावसार तसेच डॉ. प्रभाकर गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापकवर्ग तसेच साहित्यप्रेमी उपस्थितांनी सभागृह भरून गेले होते.वा.ल. कुलकर्णी यांचे विद्यार्थी असलेले मा. श्री. कौतिकराव ठाले-पाटील यांनी आपल्या व्याख्यानात गुरुवर्य वा.ल. कुलकर्णी यांच्या साहित्यिक, समीक्षणात्मक व शैक्षणिक योगदानाचा व्यापक आढावा घेतला. कुलकर्णी यांनी मराठवाड्याच्या शैक्षणिक व साहित्यिक जडणघडणीमध्ये जे मूलभूत योगदान दिले, त्याचे विविध पैलू त्यांनी उपस्थितांसमोर उलगडून सांगितले.मराठवाडा विद्यापीठाची निर्मिती, विद्यापीठात मराठी विभागाची स्थापना कशी झाली, त्या काळातील शैक्षणिक चळवळीची गरज आणि त्यातून उभे राहिलेले नेतृत्व याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. विद्यापीठाच्या जडणघडणीतील ऐतिहासिक टप्पे, मराठी अभ्यासाची परंपरा आणि मराठवाड्याच्या सांस्कृतिक उन्नयनाशी जोडलेली भूमिका त्यांनी प्रभावी शैलीत मांडली.कुलकर्णी यांनी केवळ साहित्यिक म्हणून नव्हे तर द्रष्टे शिक्षक व मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना दिलेले बळ, संशोधनाला दिलेली दिशा आणि बोलीभाषेच्या अभ्यासाला दिलेले महत्त्व यावरही प्रमुख वक्त्यांनी भर दिला. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, लेखनाची शिस्त लावणे, संशोधनाचा दृष्टिकोन विकसित करणे आणि स्थानिक भाषेतील अभिव्यक्तीचे मूल्य अधोरेखित करणे—या सर्व बाबींमुळे कुलकर्णी यांनी मराठवाड्यातील साहित्यविश्वाला नवी उर्जा दिल्याचे त्यांनी नमूद केले.कुलकर्णी येण्यापूर्वी मराठवाड्याची एकूण सामाजिक-सांस्कृतिक, साहित्यिक आणि शैक्षणिक परिस्थिती कशी होती, तसेच त्यांच्या कार्यानंतर या परिसरात झालेला बदल कोणत्या स्वरूपाचा होता—याचे चित्रण त्यांनी विविध उदाहरणांच्या आधारे केले.व्याख्यानादरम्यान त्यांनी मराठवाड्याच्या इतिहासाचा संदर्भ देताना सांगितले की, मराठवाडा सुमारे ६५२ वर्षे पारतंत्र्यात असल्यामुळे येथे शिक्षण आणि मराठी भाषेचा विकास तुलनेने उशिरा झाला. तथापि, तरीही मराठवाड्यातच सर्वप्रथम महानुभाव पंथीय तसेच वारकरी संप्रदायाने साहित्यनिर्मितीचा प्रवाह निर्माण केला. पुढे महाराष्ट्रभर साहित्यपरंपरा विस्तारत गेली, असा ऐतिहासिक धागा त्यांनी जोडला.या पार्श्वभूमीवर मराठवाड्याच्या साहित्यिक वारशाचे महत्त्व, त्या वारशाला आधुनिक काळात समृद्ध करण्यासाठी कुलकर्णी यांनी दिलेले योगदान, आणि विद्यापीठीय शिक्षणातून या भूमीतील साहित्यिक जाणीव जागृत करण्याची भूमिका—या सर्व बाबी त्यांनी रसाळ व अभ्यासपूर्ण भाषेत स्पष्ट केल्या. उपस्थितांनीही या व्याख्यानाला विशेष प्रतिसाद दिला.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी मराठवाड्यातील साहित्यिकांनी समाजाच्या वैचारिक जडणघडणीत दिलेले योगदान अधोरेखित केले. तसेच विद्यापीठाने वा.ल. कुलकर्णी व्याख्यानमाला आयोजित करण्याची संधी महाविद्यालयाला उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी विद्यापीठ प्रशासनाचे आभार मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. मीनाक्षी देव-निमकर यांनी केले. त्यांनी व्याख्यानमाला आयोजनामागील हेतू स्पष्ट करताना वा.ल. कुलकर्णी यांच्या विचार, लेखन आणि मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना होण्यासाठी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाची सुरुवात वा.ल. कुलकर्णी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रेमला मुखेडकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी केले. व्याख्यानमालेस महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी व प्राध्यापकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या व्याख्यानमालेमुळे विद्यार्थ्यांना साहित्य, इतिहास, विद्यापीठीय परंपरा आणि मराठवाड्याच्या सांस्कृतिक ओळखीचा व्यापक संदर्भ समजण्यास मदत झाली, असे मत उपस्थितांमधून व्यक्त करण्यात आले.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीवर महायुतीचाच झेंडा फडकवा - बसवराज पाटील



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचारार्थ उमरगा तालुक्यातील भुसणी येथील हनुमान मंदिराचे दर्शन घेऊन भाजपचे नेते बसवराज पाटील यांच्या हस्ते नारळ फोडून शुभारंभ शुक्रवारी (ता.३०) रोजी करण्यात आला. याप्रसंगी बसवराज पाटील म्हणाले की, सध्या राज्यावर उपमुख्यमंत्री कै. अजितदादा पवार यांच्या निधनाने दुःखाचे सावट पसरले आहे. अशा परिस्थितीत आपल्याला या निवडणुकांना सामोरे जावे लागत आहे. धाराशिव जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला अधिक गती द्यायची असेल, तर जिल्हा परिषद व पंचायत समितीवर महायुतीचाच झेंडा फडकवणे आवश्यक आहे. भुसणी गावाशी पाटील कुटुंबाचे असलेले जिव्हाळ्याचे संबंध अधोरेखित करून सन १९८५ च्या निवडणुकीत भुसणीकरांनी स्व. काझी साहेबांना भरघोस मताधिक्य देऊन विजयी केल्याच्या आठवणींना उजाळा दिला. भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अप), रिपाई (अ) व लहुजी शक्ती सेना महायुतीचे दाळींब गटाचे अधिकृत उमेदवार रफिक तांबोळी, गणाचे उमेदवार अमर वाले, भुसणी गणाचे उमेदवार कैलास शिंदे यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी ज्ञानराज चौगुले, शरण पाटील, कैलास शिंदे, रफिक तांबोळी आदींची भाषणे झाली. या प्रचार सभेस मुरूमचे नगराध्यक्ष तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा-लोहारा तालुक्याचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, भाजप अनुसूचित मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालेराव, शिवलिंग माळी, धनराज हिरमुखे, मल्लिनाथ हिरमुखे, गंपय्या स्वामी, प्रशांत गायकवाड, श्रीमंत पाटील, धुळप्पा पाटीप, शिवाजी संगशेट्टी, राजेंद्र व्हनाजे, बाबुराव बनसोडे, बालाजी संगशेट्टी, दशरथ माळी, धुळप्पा पाटील, महादेव पाटील, दिगंबर पांचाळ आदींची उपस्थिती होती. प्रारंभी कै. अजितदादा पवार यांना सामुदायिक भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून कोणताही सत्कार न स्वीकारता थेट सभेला सुरुवात करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात आयोजित या सभेला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद राहिला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३१ जानेवारी २०२६


## "आव्हान" शिबिरात शिवाजी महाविद्यालयातील स्वंयसेवक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**कन्नड (अरुण थोरात) :** शिवाजी महाविद्यालय, कन्नड, राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक रुपाली बोंबले, शितल दाभाडे आणि ओंकार शेळके यांनी अकोला येथील "आव्हान" आपात्कालीन व्यवस्थापन शिबिरात यशस्वी सहभाग घेतला राज्य संपर्क अधिकारी, उच्च व तंत्र विभाग, मुंबई व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अकोला येथे दिनांक १७ जानेवारी ते २४ जानेवारी या दरम्यान राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या सर्व उपक्रमात रुपाली बोंबले, शितल दाभाडे आणि ओंकार शेळके यांनी उस्फुर्त सहभाग घेतला या त्यांच्या यशा बद्दल प्राचार्य डॉ. विजय भोसले उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब मगर कार्यक्रमा-धिकारी डॉ. प्रकाश महाजन, डॉ. राकेश अहिरराव, डॉ. सीमा काशीद, डॉ सोमेश मोगरे डॉ. संतोष देशमुख प्रा. प्रगती चव्हाण व स्वयंसेवक विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## शिक्षक, विद्यार्थी आणि स्नेहभोजन! नियमित उपस्थितीसाठी इकरा पब्लिक स्कूलचा 'मास्टरस्ट्रोक





**जळगाव :** शालेय जीवनात शिस्त आणि वेळेचे महत्त्व अनन्यसाधारण असते. हेच ओळखून येथील इकरा पब्लिक स्कूलने विद्यार्थ्यांमधील नियमितता वाढवण्यासाठी एक आगळावेगळा उपक्रम राबविला. नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन महिन्यांत शाळेत 100% उपस्थिती लावणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.केवळ पदक किंवा प्रमाणपत्र न देता,या विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांसोबत दुपारचे जेवण (Lunch) करण्याची सुवर्णसंधी देण्यात आली.शाळेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल गोडी निर्माण व्हावी आणि अनुपस्थितीचे प्रमाण कमी व्हावे,या उद्देशाने हा उपक्रम आखण्यात आला होता.मुख्याध्यापक आणि शिक्षकांसोबत एकाच टेबलावर बसून जेवण केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि अभिमान ओसंडून वाहत होता.विद्यार्थ्यांचे मनोबल वाढलेशाळेच्या मुख्याध्यापकांनी यावेळी बोलताना सांगितले की, "शिक्षण प्रक्रियेत वर्गात उपस्थित राहणे ही यशाची पहिली पायरी आहे.मुलांनी आनंदाने शाळेत यावे,यासाठी आम्ही हे प्रेमाचे आमंत्रण दिले होते. या उपक्रमामुळे मुलांमध्ये आणि शिक्षकांमध्ये एक मैत्रीपूर्ण नाते तयार होण्यास मदत झाली आहे."शाळेच्या या कल्पक निर्णयाचे पालकांनीही स्वागत केले आहे. बक्षीस म्हणून मिळालेली ही 'लंच डेट' इतर विद्यार्थ्यांनाही पुढील काळात नियमित शाळेत येण्यासाठी प्रेरणा देणारी ठरेल, असा विश्वास पालकांनी व्यक्त केला. या कार्यक्रमात 100% उपस्थिती राहणाऱ्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

## मेल गेज मोडणं म्हणजे

मेल गेज मोडणं म्हणजे
स्त्रीकडे पाहण्याचा अधिकार
पुरुषाच्या नजरेतून काढून
स्त्रीच्या स्वतःच्या जाणिवेत देणं.

मेल गेज मोडणं म्हणजे
“ती कशी दिसते?” या प्रश्नाऐवजी
“ती काय आहे, काय घडवते,
आणि तिला काय हवं आहे?” हे मध्यावर आणणं.

मेल गेज मोडणं म्हणजे
संस्कृती, चारित्र्य, सभ्यतेच्या नावाखाली
स्त्रीवर ठेवलेला सततचा पहारा
निर्भयपणे मुळातून प्रश्नांकित करणं.

मेल गेज मोडणं म्हणजे
पुरुष शत्रू ठरवणं नव्हे,
तर स्त्रीला वस्तू बनवणाऱ्या
पुरुषप्रधान व्यवस्थेचं भान घेणं हेच खरं.

मेल गेज मोडणं म्हणजे
स्त्रीच्या हसण्याला, चालण्याला,
तिच्या इच्छांना अपराध ठरवणं
इथेच थांबवणं—ठामपणानं.

मेल गेज मोडणं म्हणजे
बाहेरची नजर ओळखून
मनात रुजलेली ती नजर
स्वतःच्या मनातून उपटून टाकणं.

मेल गेज मोडणं म्हणजे
मान्यता मागणं नाही कुणाची,
स्वतःची किंमत, प्रतिष्ठा
स्वतःच ठरवणं—हीच खरी क्रांती.

मेल गेज मोडणं म्हणजे
देहाला दृश्य न ठेवता
अनुभव, श्रम, स्वप्न
आणि स्वातंत्र्याचं माध्यम मानणं.

मेल गेज मोडणं म्हणजे
मोठ्या घोषणा देणं नव्हे,
तर रोजच्या जगण्यात
नकाराची निवड, स्वतःवर विश्वास हेच खरं.

मेल गेज मोडणं म्हणजे
दिसणं नव्हे—असणं निवडणं,
आणि ती निवड
स्वतःपासूनच सुरू करणं.

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## आपला नेता असा पाहिजे

आपला नेता असा पाहिजे
जनमनाचं हृदय पाहिजे
सगळ्यांचा सखा पाहिजे
जाईल तिथला झाला पाहिजे...

दीनदुबळ्यांचा वाली पाहिजे
भेदभाव तुडवणारा पाहिजे
कार्यकर्ते जपणारा पाहिजे
सर्वसामान्यांच्या मांडीला मांडी लावून
एका ताटात चटणी-भाकर खाणारा पाहिजे...

आपला नेता असा पाहिजे
आपुलकीने विचारपूस करणारा पाहिजे
लहानापासून म्हाताऱ्यांपर्यंत सगळ्यांचे चेहरे
नावासहित ओळखणारा पाहिजे...

आपला नेता असा पाहिजे
सुख-दुःखात आपल्यांच्या सोबतीला
मोठा भाऊ, बापमाणूस होऊन
आपल्यांच्या पाठीशी खंबीरपणे
उभा असणारा जाणता राजा पाहिजे...

आपला नेता असा पाहिजे
भुकेल्यांना आपल्या ताटातून
स्वतःच्या हाताने घास भरवणारा
गावाचं संगोपन करणारा पाहिजे...

आपला नेता असा पाहिजे
आपल्यांची प्रगती पाहून
अभिमानाने छाती फुगवणारा पाहिजे
पाठीवरती शाबासकी देऊन
तोंडभरून कौतुक करणारा पाहिजे...

आपला नेता असा पाहिजे
समजदार अन् उदार पाहिजे
मायेची ममता अन् बापाचं काळीज पाहिजे
जगण्यात रुबाब अन् जगवण्याची कला पाहिजे...

आकाशात उडताना मातीशी नाळ
रक्ताचं नातं नसूनही
हृदयाशी नातं जोडणारा पाहिजे
शेवटी पोरकं करून जाताना
अखवा देश ढसा-ढसा रडला पाहिजे...

**- लक्ष्मण वाल्डे -कन्नड**
**छत्रपती संभाजीनगर**




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३१ जानेवारी २०२६


## माणसाच्या मनाला जोडण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते - प्रा डॉ सोमनाथ खाडे



**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** माणसाच्या मनाला जोडण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते, राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे राष्ट्राची सेवा करणारी युवकांची संघटना होय असे प्रतिपादन मांडवा येथे जेईएस महाविद्यालय जालना च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी विद्यापीठ समन्वयक प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे यांनी केले. जेईएस महाविद्यालय जालना येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मांडवा (ता.बदनापूर,जि. जालना) येथे दिनांक २९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यापीठ समन्वयक प्रा.डॉ. सोमीनाथ खाडे होते, कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते, व्यासपीठावर मांडवा येथील सरपंच श्री.भीमराव मस्के उपसरपंच श्री.सदाशिव सोलाट बद्रीनारायण बालवाले विद्यालयाचे संचालक श्री. विठ्ठलराव सोलाट, मुख्याध्यापिका श्रीमती अंजली सोलाट यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी स्वच्छतेचे धूत संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून शिबिराचे उद्घाटन विद्यापीठ समन्वयक प्रा.डॉ. सोमीनाथ खाडे यांच्या यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी केले. विशेष श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्ती शिकवले जात असून श्रमदानाचे महत्व समजते, श्रम हेच खरे दैवत आहे असेही प्रा.डॉ.सोनवणे यांनी सांगितले. यावेळी बद्रीनारायन बारवाले विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अंजली सोलाट यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे म्हणाले की, युवकांनी जीवनामध्ये राष्ट्रसेवेचा संकल्प केला पाहिजे राष्ट्रीय सेवा योजनेतून राष्ट्रीय एकात्मतेचे अखंड दर्शन घडते . राज्यस्तरीय व राष्ट्रीय शिबिरातून राष्ट्रीय भाषांचे आदान प्रदान होते एकमेकांच्या संस्कृती चे दर्शन होते. राष्ट्रीय सेवा योजनेतून मानवतेचा संदेश मिळतो माणसाच्या मनाला मनाशी जोडण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते माणूस जोडला गेल्या की देश जोडला जातो. युवकांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते,पुढे हेच युवक राष्ट्रासाठी काम करतात , भारतीय खेड्यांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अनेक विषयावर आतापर्यंत प्रबोधन झाल्याचेही प्रा.डॉ.खाडे यांनी सांगितले.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांनी उद्योगाचे धडे घेऊन ,उद्योग क्षेत्राकडे वळावे.तुझ आहे तुझं पाशी तुझं नसे ठाव... अशी आपली सध्याची स्थिती झाल्याचे ही त्यांनी सांगितले. युवकांनी टाकाऊ पासून टिकाऊ बनवले पाहिजे. घराघरात स्वच्छतेचे महत्व पटवून सांगितले पाहिजे. स्वच्छ घर असेल तर जीवन निरोगी राहील असेही प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.राजेश सरकटे, प्रा किशोर तापडिया, प्रा डॉ गणेश कुलकर्णी ,प्रा डॉ सुनील इंदुरकर, प्रा. डॉ. गणेश रोकडे, प्रा. उषा चौधरी, प्रा. अमृता धावणे, प्रा. ऐश्वर्या तोटे, प्रा. तारो, आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. योगेश लाहामटे यांनी व्यक्त केलेत. या कार्यक्रमास मांडवा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |







## श्रीकृण महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन समारोप समारंभ व डेटा संरक्षण दिन संपन्न





**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात गेल्या पंधरा दिवसापासून विविध उपक्रमाने साजरा करत येत असलेल्या मराठी भाषा पंधरवडा समारोप समारंभ नुकताच पार पडला.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.अशोक नारनवरे ,( मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय ,औराद शहाणी )हे उपस्थित होते,कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. गुलाब राठोड होते.यावेळी मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.आशिया चिश्ती ,प्रा.डॉ.भाऊसाहेब उगले,प्रा.डॉ.किसान लोहार यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी प्रमुख वक्ते प्रा.डॉ.अशोक नारनवरे मराठी भाषा पंधरवडा निमित्त विशेष व्याख्यान झाले.मराठी भाषेची उत्पत्ती सांगत त्यांनी मराठी भाषेचा आतापर्यंतचा गाळलेला इतिहास सांगितला ते म्हणाले की,अभिजात मराठी भाषेचे केंद्र शासनाचे चार निकष असून मराठी भाषेने प्रत्येक निकष पूर्ण केलेले आहेत.कोणत्याही भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी तिचे प्राचीनत्व सिद्ध करावे लागते.म्हणजेच तिचा इतिहास कमीत कमी दीड ते दोन हजार वर्षापूर्वीचा असला पाहिजे.मराठीतील गाथासप्तशती हा ग्रंथ दोन हजार वर्षापूर्वीचा आहे हे हरी नरके यांच्या समन्वय समितीने सिद्ध केले आहे.दुसरे म्हणजे त्या भाषेतील साहित्य प्रसिद्ध आणि लोकप्रिय असले पाहिजे,तिसरे म्हणजे त्या भाषेचे मूळ आणि आताची भाषा यात अन्योन्य संबंध असला पाहिजे आणि चौथे म्हणजे ती भाषा थेट हुबेहूब दुसऱ्या भाषेची कॉपी नसली पाहिजे हे चारही निकष मराठी भाषा पूर्ण करते.मराठी उत्पत्ती ही संस्कृतपासून झालेली आहे असा गैरसमज आपल्यालयाकडे जाणीवपूर्वक पसरवण्यात आला होता तो सर्वार्थाने चुकीचा असून मागधी,अर्धमागधी,पैशाची,प्राकृत असा मराठीचा स्वतंत्र प्रवास असून मराठी ही स्वतंत्र भाषा आहे.कांहीं विद्वानांनी संस्कृत भाषा चे व्याकरण मराठीला लावून मराठीला अवघड करून टाकले.मराठीत साधारणपणे 52 मराठी बोली असून तीच अभिजात मराठी भाषा होय.पुणेरी किंवा अभिजनांची भाषा म्हणजे अभिजात मराठी भाषा नव्हे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.मराठी भाषा ही पूर्वीपासूनच समृद्ध भाषा असून ती ज्ञानभाषा आहे ,याउलट या अगोदर अनेक भाषांना जो अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे, त्या अभिजात भाषांमध्येच मराठीचा उल्लेख आलेले आहे .अनेक ठिकाणी अनेक वेळेला मराठी भाषेविषयी त्या अभिजात भाषेत उल्लेख आलेले आहेत. याचाच अर्थ त्याहीपूर्वी इथे मराठी भाषिक आणि मराठी भाषा बोलली जात होती हे सिद्ध होते.असे सांगून अत्यंत विवेचक ,निस्पृह अशी मांडणी केली. मराठी भाषा संवर्धन म्हणजे शेवटी काय तर मराठी भाषेचा जास्तीत जास्त प्रचार आणि प्रसार करून त्या अनुषंगाने विविध उपक्रमांचे आयोजन करणे मराठीच्या संदर्भान्वये विविध व्याख्यात्यांचे व्याख्यान आयोजित करणे होय.असे करणारे आणि विविध स्तुत्य उपक्रम राबविणारे माझ्या आयुष्यातील हे पहिले महाविद्यालय आहे.असे सांगून मी आयुष्यभर हा क्षण मी माझ्या काळजात कोरून ठेवेन असा उल्लेख करून ग्रामीण भागात असलेले आणि पंधरा दिवस उपक्रम राबविलेले हे माझ्या पाहण्यात पहिले महाविद्यालय आहे असेही प्रमुख पाहुणे डॉ.अशोक नारनवरे यांनी अभिमानाने सांगितले.त्यानंतर प्रा.डॉ.उमाकांत सूर्यवंशी यांनी पंधरा दिवस घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा,घोषवाक्य स्पर्धा,भित्तीपत्रक स्पर्धा,काव्यवाचन स्पर्धा,हस्ताक्षर स्पर्धा आणि काव्यलेखन स्पर्धेत प्रथम,द्वितीय आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांच्या नावाची घोषणा करून प्रमुख वक्ते डॉ.अशोक नारनवरे यांच्या हस्ते त्यांना प्रमाणपत्र,पेण आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.मराठी भाषा पंधरवडा निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध उपक्रमाचे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांनीही विशेष कौतुक करत येणाऱ्या कांहीं दिवसात आपण स्नेहसंमेलन नाही पण त्या धर्तीवर विशेष असा कार्यक्रम आयोजित केला जाईल असे आश्वासन दिले.मराठी भाषेचे संवर्धन करणे ही सर्वांची जबाबदारी असून प्रत्येकांनी आपल्या मातृभाषेविषयी कृतज्ञता व्यक्त करून मराठी भाषेचे संरक्षण केले पाहिजे असे सांगितले.त्याचबरोबर प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांनी अभिजात मराठीविषयी प्रमुख पाहुण्यांनी तर्कशुद्ध व तर्क कठोर केलेल्या सविस्तर मांडणीविषयी कुतूहल व्यक्त केले आणि अध्यक्षीय समारोप केला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला प्रमुख उपस्थितांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले ,मराठी भाषा पंधरवडा निमित्त कु .आकांक्षा म्हेत्रे व कुं.स्वाती घोडके या दोन विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात त्यांनी आम्हाला मराठी विभागाने व्यासपीठ उपलब्ध करून आमच्या सुप्त कलागुणांना वाव दिले.आम्हाला मंचावर बोलण्याचे धाडस आले.मराठी भाषेविषयी आणखी जिव्हाळा निर्माण झाला,असे सांगितले.यावेळी प्रा.आय.एस.इनामदार यांनी डेटा संरक्षन दिवसानिमित्त सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नागसेन कांबळे यांनी केले प्रास्ताविक डॉ. मेघा जोशी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ.विनोद धनेराव यांनी करून दिला.कार्यक्रमाचे रीतसर आणि सविस्तर आभार प्रा.आशिया चिश्ती यांनी मानले. पसायदानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.